ब) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.

क) ऑनलाईन निविदा प्रक्रिये बाबतची संपूर्ण माहिती पाणीपुरवठा विभाग पुणे म. न. पा. येथे मिळेल.

ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि.)/३२ दि. २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम इ. सी. एस./आर. टी. जी. एस./एन. ई. एफ. टी. सुविधेमार्फतच स्विकारणेत येणार आहे.

सही/ –
कार्यकारी अभियंता
स्वारगेट पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/६६४ दि. २८/०८/२०२६

pnb Housing Finance Limited — Ghar Ki Baat

APPENDIX -IV-A - E-AUCTION-PUBLIC SALE NOTICE of IMMOVABLE PROPERTY/IES

E-AUCTION-SALE NOTICE FOR SALE OF IMMOVEABLE ASSETS UNDER THE SECURITISATION AND RECONSTRUCTION OF FINANCIAL ASSETS AND ENFORCEMENT OF SECURITY INTEREST ACT, 2002 READ WITH PROVISO TO RULE 8(6) OF THE SECURITY INTEREST (ENFORCEMENT) RULES, 2002)

REG. OFF.:- 9TH FLOOR, ANTRIKSH BHAWAN, 22 K. G. MARG, NEW DELHI–110001, PH.:-011-23357171, 23357172, 23705414, Web:-www.pnbhousing.com

Branch Address: Shelar Park, Building No. 5, Office No. 1, Third Floor, Swami Tirth, Kadakpada Circle, Kalyan West – 421301, Maharashtra, Branch Address: 1st Floor, Unit No. 103–106, Centurion Business Park, Near Dwarka Hotel, Wagle Industrial Estate, S.G. Barve Marg, Nehru Nagar, Plot No. A-84, A-85, Thane West – 400604, Maharashtra, Branch Address: No. 2 & 3, Ground Floor, Baba House, Sir M.V. Road, J. B. Nagar, Andheri East, Mumbai – 400093, Maharashtra, Branch Address: Shop No. 1 & 2, Ground Floor, Sai Arcade Building, Boisar–Palghar Road, Boisar – 401501, Maharashtra, Branch Address: Persepolis CHS Ltd., 5th Floor, Flat No. 508–509, Sector 17, Vashi, Navi Mumbai – 400703, Maharashtra, Branch Address: Office No. 6, First Floor, Neel Empress CHSL, Sector 1/S, Near Panvel Railway Station, Panvel – 410206, Maharashtra,

Notice is hereby given to the public in general and in particular to the borrower(s) & guarantor(s) indicated in Column no-A that the below described immovable property (ies) described in Column no-D mortgaged/charged to the Secured Creditor, the constructive/Physical Possession of which has been taken (as described in Column no-C) by the authorized Officer of **M/s PNB Housing Finance Limited**/Secured Creditor, will be sold on "AS IS WHERE IS, AS IS WHAT IS and WHATEVER THERE IS BASIS" as per the details mentioned below. Notice is hereby given to borrower(s)/mortgagor(s)/Legal Heirs, Legal Representative, (whether Known or Unknown), executor(s), administrator(s), successor(s), assignee(s) of the respective borrowers/ mortgagor(s)(since deceased) as the case may be indicated in Column no-A under Rule-8(6) & 9 of the Security Interest Enforcement Rules, 2002 amended as on date. **For detailed terms and conditions of the sale, please refer to the link provided in M/s PNB Housing Finance Limited/secured creditor's website i.e. www.pnbhousing.com.**

Loan No. Name of the Borrower/ Co-Borrower/Guarantor/Legal heirs(A)	Demanded Amount & Date (B)	Nature of possession (C)	Description of the Properties mortgaged (D)	Reserve Price (RP) (E)	EMD (10% of RP) (F)	Last Date of Submission of Bid (G)	Bid Incremental Rate (H)	Inspection Date & Time (I)	Date of Auction & Time (J)	Known Encumbrances/Court Case if any (K)
HOU/KLN/0917/434529, Mandar Mohan Gurav / Meenal Mohan Gurav, B.O.: Kalyan	Rs. 18,19,619.22 & 13.01.26	Physical	Building No. 14, Ground, 1, Raj Baug, Commercial Complex on S. No. 44, 45 & C.S. No. 78, 79A, Neral, near Mahesh Theater/Near Talathi Off., Ratnadeep Colony, Tal. Karjat, Dist.-Raigad 410101, near Neral Railway Station & Mahesh Cinema Hall, **Thane, Maharashtra-410101**	Rs. 18,76,000	Rs. 1,87,600	28.09.26	Rs. 10,000	09.09.26 12:00 PM-4:00 PM	29.09.26 2:00 PM-03:00 PM	*NIL/Not Known
HOU/KLN/0222/956263 Gopinath Murlidhar Suradakar / Jyoti Baburao Kamble B.O.: Kalyan	Rs. 21,81,949.84 & 05.09.24	Physical	Wing L, 1.0, 108.0, Mohan Nano Estate, S. No. 24/1p, 24/2p, 24/4, 24/6p, 24/8, 24/9, 25/1, 25/2, 178 Khoj-Khuntavli, Ambernath, near Mohan Suburbia, **Thane, Maharashtra-421501**, India.	Rs. 20,09,000	Rs. 2,00,900	28.09.26	Rs. 10,000	02.09.26 12:00 PM-4:00 PM	29.09.26 2:00 PM-03:00 PM	*NIL/Not Known
HOU/THA/1118/608860 Alpeshkumar Maganbhai Malaviya / Anisha Tankariya, B.O.: Thane	Rs. 67,13,332.16 & 27.01.25	Physical	Flat No. 201, B Wing, Rose Aapartment, Plot No. 88, Sector 20, Ulwe, Navi Mumbai, **Maharashtra, India, 410206.**	Rs. 34,12,000	Rs. 3,41,200	28.09.26	Rs. 10,000	07.09.26 12:00 PM-4:00 PM	29.09.26 2:00 PM-03:00 PM	*NIL/Not Known
00136660003418 Bhaurao Kachru Ghuge / Jyoti Bhaurao Ghuge, B.O.: Mumbai	Rs. 90,85,846.33 & 20.11.19	Physical	102, 1st Floor, Atlanta Lodha Aqua, Dahisar East, Mumbai, **Maharashtra, 400068.**	Rs. 1,64,71,000	Rs. 16,47,100	28.09.26	Rs. 1,00,000	08.09.26 12:00 PM-4:00 PM	29.09.26 2:00 PM-03:00 PM	*NIL/Not Known
HOU/BOSR/0220/779876 Alok Vijayshyam Tiwari / Nirmala Nirmala B.O.: Boisar	Rs. 16,26,067.73 & 14.10.25	Physical	6, Ground, Building No. 9, Type C2, Ambrosia,

२२ विद्यार्थिनींचा विनयभंग करणारा आरोपी आधीही पोक्सो गुन्ह्यात तुरुंगात

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील एका सरकारी आश्रमशाळेत २२ अल्पवयीन विद्यार्थिनींचा विनयभंग केल्याप्रकरणी अटकेत असलेला स्वयंपाकी सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले आहे. त्याच्यावर यापूर्वीही 'पोक्सो' कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला होता आणि तो तुरुंगातही गेला होता. तरीही त्याला सेवेत पुनर्रचित (पुन्हा रुजू) कसे करण्यात आले, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूरच्या प्रकल्प अधिकारी तेजस्विनी आर. गालंडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गणपत गवळी हा शहापूर तालुक्यातील टेंभा येथील आश्रमशाळेत कार्यरत होता. यापूर्वी अघई येथील आश्रमशाळेत असतानाही त्याच्यावर अशाच प्रकारच्या गुन्ह्याचा आरोप झाला होता. चालू आठवड्यात झालेल्या अटकेनंतर गवळी याला तत्काळ निलंबित करण्यात आले आहे.

पोक्सोनुसार गुन्हा

गवळी याच्या निवृत्तीला अवघे १० महिने शिल्लक होते. तो एक सराईत गुन्हेगार आहे. अघई येथील आश्रमशाळेत असताना त्याच्यावर 'पोक्सो' कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला होता आणि त्याला निलंबितही करण्यात आले होते.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की कोहली फॅमिली सेटलमेंट - (एक फॅमिली ट्रस्ट) हे द युनायटेड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, कॉमनवेल्थ बिल्डिंग, १८१, मादाम कामा रोड, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२० येथे स्थित सोसायटीचे सदस्य असून, त्यांच्याकडे १ल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ३ आहे आणि त्यांनी (i) दिनांक २०.१.१९५७ रोजीचे मूळ शेअर प्रमाणपत्र क्र. १०८, ज्यामध्ये प्रत्येकी रु. ५०/- चे पूर्ण भरणा केलेले २४५ (दोनशे पंचेचाळीस) शेअर्स, विशिष्ट क्र. १६०६ ते १८५० (दोन्ही समाविष्ट) आहेत आणि (ii) दिनांक २०.९.१९६० रोजीचे मूळ नॉन रिफंडेबल डिपॉझिट प्रमाणपत्र क्र. १०८, रु. १६१७९/- चे, यांच्या ऐवजी डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्रांसाठी अर्ज केला आहे. द युनायटेड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड यांनी जारी केलेली आणि सोसायटीने सदस्यांच्या नावे विधिवत हस्तांतरित केलेली सदर प्रमाणपत्रे हरविल्याचे/गहाळ झाल्याचे किंवा अन्यथा शोध न लागल्याचे कळविण्यात आले आहे. त्यासंदर्भात सदस्यांनी मरीन ड्राइव्ह पोलीस ठाणे, मुंबई - ४०० ०२० येथे एफआयआर क्र. ११५४७७ सन २०२६ दाखल केला आहे.

सोसायटी याद्वारे डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्रे जारी करण्यासंदर्भात कोणतेही दावे आणि हरकती, असल्यास, या सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, संबंधित पुरावे आणि दाव्याच्या समर्थनार्थ कागदपत्रांसह सोसायटीच्या कार्यालयात सादर करण्यासाठी आमंत्रित करीत आहे; असे करण्यात कसूर केल्यास, अशा कोणत्याही दाव्याचा संदर्भ न घेता सोसायटी त्यांना डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्रे जारी करेल आणि असा दावा, असल्यास, त्याग केलेला मानला जाईल.

मुंबई
दिनांक: २९.०८.२०२६

सही/-
मा. सचिव
द युनायटेड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड यांच्यासाठी कॉमनवेल्थ बिल्डिंग च्या बाजुला, १८१, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०२०.

मुंबई-गोवा महामार्गावरील खड्डे तातडीने बुजवून दुरुस्ती करा

रायगडचे पालकमंत्री गोगावले यांचे प्रशासनाला आदेश

अलिबाग : गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या हजारो भाविकांचा प्रवास सुरक्षित आणि विनाअडथळा व्हावा यासाठी मुंबई-गोवा महामार्गावरील खड्डे तातडीने बुजवून रस्त्याची दुरुस्ती करण्याचे आदेश रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांनी प्रशासनाला दिले आहेत.

अलिबाग येथील जिल्हा नियोजन भवनात आगामी गणेशोत्सव, दहीहंडी आणि नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित शांतता समितीच्या बैठकीत पालकमंत्र्यांनी हे निर्देश दिले. त्यानंतर त्यांनी स्वतः पनवेल-पळस्पे ते माणगाव दरम्यान मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी करून अधिकाऱ्यांना खराब रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याचे आदेश दिले.

खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग मंदावतो आणि पर्यायाने महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होते. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी कोणतीही दिरंगाई न करता रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम त्वरित पूर्ण करावे. पाहणीदरम्यान जेथे त्रुटी आढळत आहेत, तेथे तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले जात आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. गणेशोत्सवाच्या काळात मुंबई व उपनगरांतून रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गसह संपूर्ण कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची महामार्गावर मोठी गर्दी होते. या पार्श्वभूमीवर रस्त्यावरील दुरुस्तीच्या कामांमुळे कुठेही वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या आहेत.

चालकांच्या सोयीसाठी पर्यायी मार्गांवर स्पष्ट दिशादर्शक फलक लावले जातील. तसेच इंदापूर, माणगाव, लोणेरे आणि पोलादपूर यांसारख्या प्रमुख ठिकाणी वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी अतिरिक्त पोलीस कर्मचारी तैनात केले जातील. वाहने बंद पडल्यास किंवा अपघात झाल्यास तातडीने मदतीसाठी महामार्गावर २० क्रेन, २० रुग्णवाहिका आणि वाहतूक नियंत्रणासाठी २५ दुचाकी पथके तैनात करण्यात आली आहेत. खारपाडा, खारेपाटण, वाकण, कोलाड, इंदापूर, माणगाव, लोणेरे, महाड, महाड एमआयडीसी आणि पोलादपूर येथे सुविधा केंद्रे उभारली जाणार आहेत. या केंद्रांवर पिण्याचे पाणी, वैद्यकीय मदत, पोलीस मदत कक्ष, महिला व बालकांसाठी सुविधा, वाहन चालकांसाठी विश्रांतीची जागा आणि हवा भरण्याची सुविधा उपलब्ध असेल.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी शांतता समितीच्या सदस्यांचे पोलीस पडताळणीचे काम तीन दिवसांत पूर्ण करून त्यांना ओळखपत्रे वाटप करण्याचे निर्देश दिले. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत स्थानिक बचाव पथकांशी आधीच समन्वय साधण्याचे आवाहन केले. कोणतीही आपत्ती आल्यास सरकारी यंत्रणा पोहोचण्यापूर्वी स्थानिक बचाव पथके मदतीला धावून येतात. त्यामुळे सणांच्या काळात त्यांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाने त्यांच्याशी पूर्व-समन्वय ठेवावा, असे तटकरे म्हणाल्या.

कूपरमध्ये रुग्णांना तुसडेपणाची वागणूक

कर्मचाऱ्यांना संवेदनशीलतचे धडे देण्याचे भाजप अध्यक्षांचे आयुक्तांना पत्र

मुंबई : जुहू येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या डॉ. आर. एन. कूपर रुग्णालयीन कर्मचारी रुग्णांना तुसडेपणाची वागणूक देतात, असा गंभीर आरोप मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम यांनी केला आहे. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांमध्ये संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी कर्मचाऱ्यांना संवाद कौशल्ये प्रशिक्षण देण्याची मागणी साटम यांनी केली आहे.

महापौर रितू तावडे आणि पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना शुक्रवारी लिहिलेल्या पत्रात आमदार साटम यांनी रुग्णालयाशी संबंधित अनेक मुद्द्यांकडे लक्ष वेधले. तत्पूर्वी, त्यांनी रुग्णालयाचे अधिष्ठाता (डीन) आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी तसेच डीएमसी (आरोग्य) शरद उघडे यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेतली.

आमदार अमित साटम यांनी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीबाबत चिंता व्यक्त केली. डॉक्टर, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, सुरक्षारक्षक व इतर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची गरज असून क्षमता-बांधणी कार्यक्रम राबवण्याची मागणी केली. कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तणुकीने रुग्णालयाची व पालिकेची प्रतिमा मलीन होत असल्याचे ते म्हणाले.

एकाच कंत्राटदारासाठी आग्रह

निर्णय होऊनही विभागाने 'जेम' पोर्टलवर निविदा काढली नाही. एकमेव निविदाधारकालाच कंत्राट देण्याचा आग्रह धरला. परिणामी, कूपर आणि सायन रुग्णालयांना दोन वर्षे डिजिटल यंत्रांपासून वंचित राहावे लागले. ही उपकरणे त्वरित कूपर आणि सायन रुग्णालयांच्या सेवेत आणली जातील याबाबत पावले उचलली जावीत आणि विलंबाबाबत चौकशी करावी, अशी मागणी साटम यांनी पत्रात केली आहे.

केमोथेरपी केंद्र लवकर कार्यान्वित करा!

पश्चिम उपनगरातील कर्करोग रुग्णांची सोय करण्यासाठी, प्रस्तावित केमोथेरपी केंद्र (ज्यासाठी आधीच निविदा काढण्यात आली आहे.) लवकर कार्यान्वित करावे तसेच बाहेर जन्मलेल्या बालरुग्णांना दाखल करण्याची व्यवस्था करावी आणि अशा रुग्णांसाठी स्वतंत्र कक्ष तयार करावा, अशी सूचना आमदार साटम यांनी केली.

पुरेसे सुरक्षारक्षक तैनात करा

१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पालिका रुग्णालयामध्ये महाराष्ट्र सुरक्षा दलाचे पुरेसे सुरक्षा कर्मचारी कायमस्वरूपी तैनात करावेत. पुढील ३ महिन्यांत आवश्यक मनुष्यबळ भरती करावे तसेच डायलिसिस केंद्राची क्षमता ६ वरून २० पर्यंत वाढवून प्रक्रिया सुलभ करावी, असा आग्रह आमदार साटम यांनी पालिका प्रशासनाकडे धरला.

'हाऊसकीपिंग'ची नवीन निविदा प्रक्रिया राबवा!

'क्वालिटी-कम-कॉस्ट-बेस्ड सिलेक्शन' प्रणाली अंतर्गत कठोर उत्तरदायित्व अटींसह 'हाऊसकिपिंग'ची नवीन निविदा काढण्यात यावी. पुरेशा उत्तरदायित्वासह नामांकित हाऊसकीपिंग एजन्सीची नियुक्ती करावी, जेणेकरून रुग्णालयातील स्वच्छता खाजगी रुग्णालयाच्या तोडीस तोड असेल, असे साटम यांनी पालिका प्रशासनाला बजावले.

देयकांची थकीत रक्कम द्या; पाच कंत्राटदारांनी जीवन संपवल्याचा असोसिएशनचा आरोप

मुंबई : राज्य सरकारच्या विविध विभागांतील विकास कामे मार्गी लावल्यानंतर देयकाची रक्कम मिळवण्यासाठी वारंवार पाठपुरावा करुनही दुर्लक्ष केले जात आहे. राज्य सरकारच्या या भूमिकेला कंटाळून राज्यातील पाच कंत्राटदारांनी जीवन संपवल्याचा आरोप नागपूर कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष सुबोध सरोदे यांनी केला आहे.

सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर अंतर्गत कंत्राटदारांचे विविध शीर्षाखाली सुमारे १,८९० हजार कोटी रुपयांची देयके प्रलंबित आहे. त्यामुळे कंत्राटदारांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली आहे.

आत्महत्या करण्याचा शेवटचा पर्याय...

प्रलंबित देयके न मिळाल्यामुळे सांगली येथील युवा कंत्राटदार हर्षल पाटील यांनी आत्महत्या केली, वर्धेला बाबा झाकीर या कंत्राटदाराने आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला, नागपूरचे कंत्राटदार मुन्ना वर्मा यांनी थकीत देयके न मिळाल्यामुळे आत्महत्या केली. तीन दिवसापूर्वी नांदेड जिल्ह्यातील कंत्राटदार गजाभाऊ देवकाते यांनी सुद्धा थकीत देयके न मिळाल्यामुळे आत्महत्या केली. राज्य सरकार देयकांची रक्कम देत नसल्याने कंत्राटदारांकडे आत्महत्या करण्याचा शेवटचा पर्याय उरला आहे. राज्य सरकारने कंत्राटदारांच्या हलाखीची आर्थिक स्थिती ओळखून देयकाची रक्कम लवकरात लवकर द्यावी, असे पत्र सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना लिहिल्याचे सुबोध सरोदे यांनी सांगितले.

कंत्राटदारांची आर्थिक स्थिती ढासळतेय...

नागपूर विभागातील कंत्राटदारांची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस ढासळत असून कंत्राटदार टोकाचे पाऊल उचलू शकतात. कंत्राटदारांवर अवलंबून असलेले बांधकाम साहित्य पुरवठादार, काम करणारे लेबर कॉन्ट्रॅक्टर, कंत्राटदारांचे कार्यालयीन कर्मचारी, साईट इंजिनियर, सुपरवायझर तसेच बँकेतून घेतलेले कर्ज यांचे फार मोठ्या प्रमाणात थकीत पेमेंट करावयाचे असल्यामुळे सर्व कंत्राटदार प्रचंड मानसिक तणावात आहे. सोबतच कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याची जबाबदारी आहेच. देयकाचे १०० टक्के भुगतान् होत नसल्यामुळे कंत्राटदारांचे आर्थिक नियोजन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे, असे ही ते म्हणाले. नवी मुंबई येथे राहणारे गजानन देवकाते यांनी नुकतीच आत्महत्या केली, समस्त कंत्राटदारांकडून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. II यांच्यासमक्ष
(वित्त मंत्रालय)
३रा मजला, टेलिफोन भवन, स्ट्रँड रोड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५
मूळ अर्ज क्र. ५४४ सन २०२५

निशाणी क्र. ११

एचडीएफसी बँक लिमिटेड ...अर्जदार

विरुद्ध

स्वप्निल नामदेव गुंजकर आणि अन्य ...प्रतिवादी

समन्स

ज्याअर्थी, वरील नमूद **ओ.ए. क्र. ५४४ सन २०२५** सन्माननिय पीठासीन अधिकाऱ्यांसमोर २८/०७/२५ रोजीस सूचीबद्ध केला होता.

ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. २९,३८,३९९.८२/- (रुपये एकोणतीस लाख अडतीस हजार तीनशे नव्वान्नव आणि ब्याऐंशी पैसे मात्र)** च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या (ओए) ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर समन्स/सूचना जारी केली. (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज).

ज्याअर्थी समन्सच्या सेवेवर सामान्य पद्धतीने परिणाम होऊ शकत नाही आणि या माननीय न्यायाधिकरणाने बदली सेवेसाठी अर्ज करण्यास परवानगी दिली आहे.

ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या **३० तीस** दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;
२. मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;
३. मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ (ए) अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.
४. तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.
५. व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.
६. तुम्हाला **२६/१०/२०२६ रोजी स. ११.०० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे आणि **डीआरटी-II** च्यांसमोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

माझ्या हस्ते, सहीने आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या दिनांक ०५ मे, २०२६ रोजी दिले.

सही/-
प्रबंधक,
डीआरटी-II, मुंबई

शिक्का

प्रति,
१. स्वप्नील नामदेव गुंजकर (कर्जदार)
एक प्रौढ, भारतीय रहिवासी, ज्यांचा पत्ता येथे फ्लॅट क्र. ७०१, विघ्नहर्ता डेव्हलपर्स, प्लॉट क्र. १७, सेक्टर - २, उलवे वहाळ, उलवे, रायगड, महाराष्ट्र - ४१०२०६
२. सुनील नामदेव गुंजकर (सह-कर्जदार)
एक प्रौढ, भारतीय रहिवासी, ज्यांचा पत्ता येथे फ्लॅट क्र. ७०१, विघ्नहर्ता डेव्हलपर्स, प्लॉट क्र. १७, सेक्टर - २, उलवे वहाळ, उलवे, रायगड, महाराष्ट्र - ४१०२०६

ASIAN
ASIAN WAREHOUSING LTD.

एशियन वेअरहाऊसिंग लिमिटेड
सीआयएन: एल५२१००एमएच२०१२पीएलसी२३०७१९
५०८, दलामल हाऊस, जमनालाल बजाज रोड, नरिमन पॉइंट, मुंबई, महाराष्ट्र, भारत ४०००२१
दूरध्वनी: ०२२-२२८१२०००, | ईमेल: info@asianw.com, | वेबसाइट: www.asianw.com

व्हिडिओ कॉन्फरन्स आणि/किंवा इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या १४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-व्होटिंगची माहिती

एशियन वेअरहाऊसिंग लिमिटेड (''कंपनी'') च्या सदस्यांची चौदावी (१४ वी) वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') सोमवार, दिनांक **२१ सप्टेंबर, २०२६ रोजी स. १०.०० वा.** (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'')/इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे (''ओएव्हीएम'') आयोजित करण्यात येणार असून, एजीएमच्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे कामकाज करण्यासाठीची सूचना, वित्तीय विवरणपत्रे, बोर्ड अहवाल आणि इतर कागदपत्रांसह, शुक्रवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२६ रोजी कंपनीच्या सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आली आहेत.

तसेच, ज्या सदस्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत, अशा सदस्यांना वार्षिक अहवाल पाहण्यासाठी वेब-लिंक उपलब्ध करून देणारे पत्र पाठविण्यात येत आहे. एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल २०२५-२६ कंपनीच्या वेबसाइट https://www.asianw.com/general-meeting.html वर आणि https://www.asianw.com/Pdf%20Files/Annual%20Report/Annual%20Report_2025-26.pdf तसेच स्टॉक एक्सचेंज म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com वेबसाइटवरही उपलब्ध आहेत.

सदस्य केवळ व्हीसी/ओएव्हीएम माध्यमांद्वारे १४ व्या एजीएममध्ये सहभागी होऊ शकतात आणि भाग घेऊ शकतात. एजीएममध्ये सहभागी होण्याच्या सूचना आणि रिमोट ई-व्होटिंगची प्रक्रिया किंवा एजीएमदरम्यान ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान करण्याची प्रक्रिया, भागधारकांना पाठविण्यात आलेल्या एजीएमच्या सूचनेत देण्यात आली आहे. व्हीसी/ओएव्हीएम माध्यमांद्वारे सहभागी होणाऱ्या सदस्यांची कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत गणपूर्तीची गणना करण्याच्या उद्देशाने गणना केली जाईल.

दिनांक १४ सप्टेंबर, २०२६ या कट-ऑफ दिनांक रोजी प्रत्यक्ष किंवा डिमटेरियलाइज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणारे सदस्य ठरावांवर त्यांचे मत देऊ शकतात. रिमोट ई-व्होटिंगचा कालावधी शुक्रवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०२६ रोजी स. ९.०० वा. (भाप्रवे) ला सुरू होईल आणि रविवार, दिनांक २० सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वा. (आयएसटी) समाप्त होईल. सदस्य उपरोक्त कालावधीत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांचे मत देऊ शकतात.

कायद्याच्या कलम ९१ मधील तरतुदी आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४२ अन्वये, १४ व्या एजीएमच्या उद्देशासाठी कंपनीची सदस्य नोंदवही आणि शेअर हस्तांतरण पुस्तके मंगळवार, दिनांक १५ सप्टेंबर २०२६ ते सोमवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२६ (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील. प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना दिनांक ०७ मे, २०२४ च्या सेबी मास्टर सर्क्युलर क्र. सेबी/एचओ/एमआयआरएसडी/पीओडी-१/पी/सीआयआर/२०२४/३७ अन्वये त्यांचे केवायसी तपशील अद्ययावत करण्याची विनंती करण्यात येते. कोणत्याही निराकरण न झालेल्या शंका असल्यास सदस्य info@asianw.com येथे ई-मेल पाठवून कंपनीच्या सचिवीय विभागाशीही संपर्क साधू शकतात.

कोणत्याही शंका असल्यास, आपण evoting@nsdl.com च्या डाउनलोड विभागात भागधारकांसाठी उपलब्ध असलेल्या वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि ई-व्होटिंग यूजर मॅन्युअलचा संदर्भ घेऊ शकता किंवा . येथे विनंती पाठवून एनएसडीएल हेल्पडेस्कशी संपर्क साधू शकता किंवा +०२२ - ४८८६ ७००० आणि +०२२ - २४९९ ७००० या क्रमांकांवर कॉल करू शकता.

दिनांक: २५ ऑगस्ट, २०२६
ठिकाण: मुंबई

एशियन वेअरहाऊसिंग लिमिटेड करिता
सही/-
सोनी पवनन
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

मुंबई येथील उच्च न्यायालयात
मृत्युपत्रीय आणि विना-मृत्युपत्रीय अधिकारिता
याचिका क्र. ४२५१ सन २०२४

फिलोमेना लिओ सिक्वेरा, विधवा, भारतीय, ख्रिश्चन, मुंबई निवासी, व्यवसाय:- व्यवसाय, ज्या त्यांच्या मृत्युसमयी १२०१, सुगी सदन, गोखले रोड, दक्षिण दादर, मुंबई-४०००२८ येथे राहत होत्या, यांच्या दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या अंतिम मृत्युपत्र आणि इच्छापत्राच्या प्रोबेटसाठी याचिका. ...मृत

१. शार्लोट फ्लेवियन लोबो
वय: ६९ वर्षे, व्यवसाय- गृहिणी, राहणार १०५/बी, मर्क्युरी, ४था क्रॉस रोड, लोखंडवाला, संघवी हॉस्पिटल, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०००५३.

२. सेड्रिक लिओ सिक्वेरा
वय: ६० वर्षे, व्यवसाय: सेवा, राहणार २, धुरी व्हिला, के टी व्हिलेज, ग्रेटर बँक जवळ, दिवाणमान समता नगर, वसई पश्चिम, वसई, पालघर, ४०१२०२, हे दोघेही उपरोक्त मृत व्यक्तीच्या अंतिम मृत्युपत्र आणि इच्छापत्राअंतर्गत निष्पादक आहेत. ...याचिकाकर्ते

प्रति,
१. सर्व संबंधित.
२. फिलोमेना ओस्वाल्ड सिक्वेरा
रूम क्र. १, साई सागर अपार्टमेंट, साई बाजार जवळ, फ्लायओव्हर समोर, तुळींज रोड, नालासोपारा पूर्व, तालुका वसई, जिल्हा ठाणे

उपरोक्त मृत व्यक्तीच्या संपत्तीमध्ये आपला कोणताही हितसंबंध असल्याचा दावा असल्यास, प्रोबेट मंजूर करण्यापूर्वीच्या कार्यवाहीत उपस्थित राहून ती पाहण्यासाठी आपल्याला याद्वारे उद्धृत करण्यात येत आहे.

प्रोबेट मंजूर करण्यास आपला विरोध असल्यास, ही उद्धरण सूचना आपल्यावर बजावल्याच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत, प्रोतोनोटरी आणि सिनियर मास्टर यांच्या कार्यालयात कॅव्हिएट दाखल करावे.

''आपल्याला याद्वारे सूचित करण्यात येते की पात्रतेच्या निकषांनुसार राज्य विधी सेवा प्राधिकरणे, उच्च न्यायालय विधी सेवा समित्या, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणे आणि तालुका विधी सेवा समित्यांकडून मोफत विधी सेवा उपलब्ध आहेत आणि आपण पात्र असल्यास व मोफत विधी सेवेचा लाभ घेण्याची इच्छा असल्यास, आपण वरीलपैकी कोणत्याही विधी सेवा प्राधिकरण/समितीशी संपर्क साधू शकता.''

साक्षी: श्री. रवींद्र व्ही. घुगे, कार्यवाहक मुख्य न्यायमूर्ती,
उपरोक्त ठिकाणी दिनांक १९ ऑगस्ट, २०२६ रोजी.

प्रोथोनोटरी आणि सिनियर मास्टर यांच्यासाठी
प्रशांत एस. गोयल **शिक्का**
याचिकाकर्त्यांचे वकिल **दिनांक २४ ऑगस्ट, २०२६**

दिल्लीतील आयएसआय समर्थित हेरगिरीचे जाळे उघड

नवी दिल्ली : दिल्ली पोलिसांच्या 'स्पेशल सेल'च्या 'नॉर्दर्न रेंज'ने पाकिस्तानमधून चालवल्या जाणाऱ्या हेरगिरीच्या जाळ्याचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी दिल्लीतील मोहम्मद साहिल आणि त्याची पत्नी समीरा या जोडप्याला अटक केली आहे. हे जोडपे २०२४ पासून सोशल मीडियाद्वारे पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेच्या हस्तकांच्या संपर्कात होते आणि त्यांना मदत करत होते, असा आरोप त्यांच्यावर आहे.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, आरोपी जोडप्याने पाकिस्तानातील हँडलर्सना लॉजिस्टिकल मदत पुरवली होती. या जाळ्याशी संबंधित व्यक्तींनी भारतात सक्रिय असलेल्या स्थानिक लोकांच्या मदतीने भारतीय मोबाइल सिम कार्ड्स मिळवली होती. ही सिम कार्ड्स दुबईमार्गे पाकिस्तानात पाठवली जात होती. तपास यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, प ाकिस्त ान ात पोहोचल्यानंतर या भारतीय सिम कार्ड्सचा वापर व्हॉट्सॲप खाती सुरू करण्यासाठी केला जात असे. या खात्यांद्वारे, पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेचे हस्तक भारतीय नागरिकांचे संपर्क आणि विविध व्हॉट्सॲप ग्रुप्समध्ये घुसखोरी करून माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करत असत.

पोलिसांनी सांगितले की, २०२४ मध्ये साहिलचा इन्स्टाग्रामद्वारे एका पाकिस्तानी एजंटशी संपर्क आला. समीराच्या माध्यमातून त्याची त्या एजंटशी ओळख झाली होती आणि त्यानंतर त्याने समीराशी लग्न केले, असे समजते. पोलिसांच्या माहितीनुसार, त्या पाकिस्तानी एजंटने नंतर या जोडप्याची ओळख आणखी एका पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेच्या हस्तकाशी करून दिली. पाकिस्तानी हँडलरने या जाळ्यासाठी काम करण्याच्या बदल्यात जोडप्याला आर्थिक मोबदल्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर, हे जोडपे सिम कार्ड्स मिळवून ती पाकिस्तानात पाठवण्याच्या कामात सहभागी झाले. 'स्पेशल सेल' आता या जाळ्याशी संबंधित इतर व्यक्तींची ओळख पटवण्याचे काम करत आहे. भारतातून पाठवलेल्या सिम कार्ड्सचा वापर करून हँडलर्सनी कोणाशी संपर्क साधला आणि कोणत्या प्रकारची माहिती गोळा केली, याचा शोधही या तपासादरम्यान घेतला जात आहे. तसेच, पोलीस या जाळ्याच्या संपूर्ण कार्यपद्धतीचा आणि परदेशात असलेल्या हँडलर्सच्या भूमिकेचाही तपास करत आहेत.

'जॅव्हलिन' खरेदीबाबत भारत-अमेरिका अंतिम करार

नवी दिल्ली : भारतीय लष्कराची युद्धक्षमता अधिक मजबूत करण्यासाठी भारताने अमेरिकेकडून 'जॅव्हलिन' अँटी-टँक गायडेड मिसाईल सिस्टिम (टँकविरोधी क्षेपणास्त्र प्रणाली) खरेदी करण्याचा करार अंतिम केला आहे.

भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी सांगितले की, हा करार दोन्ही देशांमधील वाढत्या आणि अधिक मजबूत होत चाललेल्या संरक्षण सहकार्याचे प्रतीक आहे.

कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरिता) नियम ८-(१)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार यांनी **आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड** (याआधी इंडिया इन्फोलाईन हाऊसिंग फायनान्स लि. नावे ज्ञात) **(आयआयएफएल-एचएफएल)** चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ चा नियम ३ सहवाचता कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून येथील खालील नमूद कर्जदार/सह-कर्जदार यांना सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम चुकती करण्यासाठी कंपनीच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे मागणी सूचना निर्गमित केलेली आहे. कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून सदर अधिनियमाचे कलम १३(४) सहवाचता सदर रूल्सच्या नियम ८ अन्वये यात याखाली वर्णन केलेल्या मिळकतीचा **कब्जा घेतलेला** आहे. विशेषत: कर्जदार आण